# १०. बैलपोळा

• ऐका. वाचा.



सण बैलांचा
आज पोळा,
गोठ्यातील बैल
न्हाऊ घाला.



मखमली झुली,
रंगीत शिंगे,
कपाळी बांधली
रेशमी बाशिंगे.

ढवळ्या-पवळ्या
सजलेधजले.
गावभर बघा
मिरवू लागले.



आजच्या दिनी
नाही कामधाम,
पुरणपोळी खाऊन
नुसता आराम.

**– धोंडीरामसिंह राजपूत**

शब्दार्थ : **न्हाऊ घालणे** – अंघोळ घालणे. **झूल** – बैलांच्या अंगावर टाकण्यात येणारे रंगीत व नक्षीदार कापड. **बाशिंग** – बैलांच्या डोक्याला बांधण्याचे आभूषण. **दिन** – दिवस.

## स्वाध्याय

प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.

(अ) बैलांच्या सणाला काय म्हणतात?
(आ) बैलांना कसे सजवले आहे?
(इ) बैलांची नावे कोणती आहेत?
(ई) बैलपोळ्याच्या दिवशी बैलांना काय खाऊ घालतात?

प्र. २. शेवट समान असणारे कवितेतील शब्द लिहा.

**उदा.**, मखमली – झुली.

प्र. ३. बैल गोठ्यात राहतात, तसे खालील प्राणी कोठे राहतात ते लिहा.

(अ) घोडा (ई) हत्ती
(आ) वाघ (उ) मासा
(इ) माकड (ऊ) कासव

प्र. ४. खालील शब्दांपासून अनेक शब्द बनवा.

**उदा.,** कपाळी – कळी, पाळी, पाक, पाकळी.
(अ) पुरणपोळी
(आ) गावभर

प्र. ५. 'सजलेधजले' अशा शब्दांना जोडशब्द म्हणतात. कवितेत आलेले खालील जोडशब्द वाचा. जसेच्या तसे पाहून लिहा. असे आणखी काही जोडशब्द लिहा.

(अ) कामधाम
(आ) पुरणपोळी

प्र. ६. 'गावभर मिरवणे' म्हणजे संपूर्ण गावातून फिरणे. खालील शब्दांना 'भर' हा शब्द जोडा आणि वाक्यांत उपयोग करा. सांगा.

**उदा.,** बाबांनी पोतंभर धान्य आणलं.




प्र. ७. तुमच्या आवडत्या प्राण्याची माहिती पाच वाक्यांत लिहा.

---

- खालील चौकटींत काही अक्षरे दिलेली आहेत. त्या अक्षरांपासून फुलांची तेरा नावे तयार होतात. ती शोधा व लिहा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पा | रि | जा | त | क | मो |
| जा | ई | जु | ई | म | ग |
| गु | ल | छ | डी | ळ | रा |
| ला | चा | फा | अ | शे | जा |
| ब | झें | डू | बो | वं | स्वं |
| स | दा | फु | ली | ती | द |